**SCHEDULE II**

**FORM B**

# PUBLIC ANNOUNCEMENT

(Regulation 12 of the Insolvency and Bankruptcy (Liquidation Process) Regulations, 2016)

**FOR THE ATTENTION OF THE STAKEHOLDERS OF SONARCH INTERNATIONAL PRIVATE LIMITED**

**RELEVANT PARTICULARS**

| | | |
|---|---|---|
| 1 | Name of Corporate Debtor | SONARCH INTERNATIONAL PRIVATE LIMITED |
| 2 | Date of incorporation of Corporate Debtor | 19-02-2008 |
| 3 | Authority under which corporate debtor is incorporated / registered | Registrar of Companies-Mumbai |
| 4 | Corporate Identity No. / Limited Liability Identification No. of corporate debtor | U51900MH2008PTC179108 |
| 5 | Address of the registered office and principal office (if any) of corporate debtor | B-112, HIND SAURASHTRA INDUSTRIAL ESTATE, MAROL NAKA, ANDHERI (EAST), MUMBAI MH 400059 IN. |
| 6 | Date of Closure of Insolvency Resolution Process | 04-09-2023 |
| 7 | Liquidation Commencement date of Corporate Debtor | 04-09-2023 (Order was intimated to Liquidator on 03-10-2023) |
| 8 | Name and registration number of Liquidator | Mr. Vimal Kumar Agrawal<br>IBBI/IPA-001/IP-P00741/2017-2018/11247 |
| 9 | Address and E-mail of the Liquidator as registered with the Board | Office No. 4, Ground Floor C Wing, Shanti Jyot Building, Balaji Nagar, Near Railway Station, Bhayander West, Thane Pin 401101<br>E-mail: cirp.sonarch@gmail.com /vimal@vpagrawal.in |
| 10 | Last date for submission of claims | 17-10-2023 |

Notice is hereby given that the Hon'ble National Company Law Tribunal -Mumbai Bench has ordered the commencement of liquidation of the SONARCH INTERNATIONAL PRIVATE LIMITED on 4th September, 2023

The stakeholders of SONARCH INTERNATIONAL PRIVATE LIMITED , are hereby called upon to submit a proof of their claims,on or before 17th October, 2023 to the liquidator at the address mentioned against item 9


The financial creditors shall submit their claims with proof by electronic means only. All other creditors may submit the claims with proof in person, by post or by electronic means.

**Submission of false or misleading proofs of claim shall attract penalties.**

Name and Signature of Interim Resolution Professional : Vimal Kumar Agrawal

Date and Place : 05/10/2023, Mumbai

# नवाकाळ शब्दकोडे-६७६



**आडवे शब्द –** १. बहुयाबोळ ४. हिमालयाच्या आसपास आढळणारा वृक्ष, याचे लाकूड बांधकाम, जहाजबांधणी वगैरेसाठी वापरतात ८. तहानलेला १०. मृतदेह १२. रमलेला १३. लोकवार्ता १४. तपास, शोध १६. सद्वर्तन १८. सुगंध १९. होम, यज्ञ २१. इस्रायली गुप्तहेर संस्था २३. समीक्षा २४. लादी २५. शान, वैभव २७. कक्ष, हॉल २९. गती, प्रेरणा ३१. उपवासाचा गोड कंद ३३. वल्लरी, मुलींचे एक नाव ३५. हिंदूंचे दुसरे युग ३६. सुंठीचे पूर्वरूप ३७. ओरखडा ४०. दरारा, धाक ४२. जनानखाना, अंतःपूर ४३. प्रिय सखी, शाकुंतल नाटकात शकुंतलेची मैत्रीण ४४. प्रचलित ४६. वैयक्तिक, स्वतःचे ४७. अभिप्राय ४८. योग्य, पात्र ४९. फायदा ५१. एखादी गोष्ट न करण्यास सांगणे, वाळीत टाकणे ५३. भजनात वापरले जाणारे एक वाद्य, मृदुंग ५५. स्फोट, मोठा आवाज ५७. तुरुंग ५९. मुक्काम ६०. छोटा ६२. गायनातील एक राग ६५. वजनदार ६६. जिव्हा ६८. प्राक्तन, प्रारब्ध ७०. शिरकाण ७२. तोंड, मुख ७३. दंड व मनगट यांना जोडणारा भाग ७४. लहर, इच्छा ७५. गोळा, लपका ७६. सुविधा ७७. ताण, टेन्शन ७८. दिवंगत ८१. पक्का ८२. कपट ८३. तिरळा ८४. पंजाबी लोकनृत्य ८६. आयतोबा, काम न करता आयते खाणारा ८८. स्वार्थी ९०. गोड पदार्थ, बासुंदी वगैरेला सुगंध आणणारा पदार्थ ९२. प्रवास ९४. धीर, बळ, उत्साह ९६. झोपमोड ९८. लेंगा वगैरेसाठी पूर्वी वापरले जाणारे जाडेभरडे कापड १००. उत्सवाचा दिवस १०१. मित्र १०३. लिहिता वाचता येणारा १०४. भूमी १०६. पक्षाघात, एक बाजू पांगळी होणे १०८. पशू ११०. आवश्यकता १११. निरर्थक बडबड ११२. नौदल ११४. नागाचा निःश्वास ११५. शेतकरी ११६. रामजन्माची तिथी ११७. ढळलेला

**उभे शब्द –** १. अशा लोकांची पावले वंदावीत असे संतांनी सांगितले आहे २. सातू ३. उत्तराधिकारी ५. डाळढोकळी, पोळीभाजीचा सोपा विकल्प ६. दंत ७. धन, वित्त ८. तिसरी तिथी ९. फिकीर, पर्वा ११. विसार, उचल १३. अथवा १५. गूढ, खोल १७. गर्दी १८. चारित्र्यवान २०. भीम आणि दुर्योधनाचा आवडता युद्धप्रकार २२. पाकळी २६. धार्मिक स्थळाला चाललेले प्रवासी २८. तुळई ३०. भाकरीचे एक धान्य ३२. नक्षत्र, ग्रहमालेचा जनक ३४. खिडकीची काच ३६. हुकूम ३८. एक मत्स्यप्रकार, सामन ३९. चंद्र ४१. घड्याळातील घंटा ४२. रात्रीचा पाऊस ४३. कैकेयीचे एक नाव ४५. धाटणी, शैली ४६. हलगर्जीपणा ४७. सारवासारवी ४८. तिबेटी धर्मगुरू ५०. उपासमार ५२. कल्याण ५४. पाणी ५५. श्रीमंत, धनिक ५६. एकूण ५८. पांडवांनी केलेला यज्ञ ६१. साद ६३. रामाचा मुलगा ६४. वर्षे, संवत्सर ६७. विश्वास ६८. मगर ६९. पुष्कळ ७१. नमक, मीठ ७३. मध्ययुगीन काळातील पोलीस अधिकारी ७६. चंद्र ७८. कमळाचा देठ ७९. कैफ, अंमल, नशा, तार ८०. जलद, त्वरित ८१. ज्ञात ८२. त्वचा ८३. कारस्थानी ८४. खजिना ८५. फुफ्फुसाचे आजार पसरवणारा कीटक, मच्छर ८६. लोहाराचे एक अवजार ८७. खात्री करून घेणे ८९. मंत्राक्षर, मूळाक्षर ९१. दूध काढणे ९३. भ्रामक, डोळ्यांना फसवणारा ९५. देवांचा राजा ९७. गरजू, अडलेला ९९. गोंगाट १०२. जमिनीची धूप रोखणारी झाडे, कांदळवन १०३. समुद्र १०५. चिकित्सा १०७. सत्त्व १०९. आद्य कीर्तनकार ११२. आवेश ११३. पत्त्यांचा एक खेळ •

**नवाकाळ कोडे क्रमांक ६७५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. कौमुदी ३. प्रागतिक ६. चकोर ९. संविधान ११. पलाण १२. थेरडा १४. लक्षवेधी १६. कनक १८. घाट २०. डूल २१. काकडा २२. कोष्टक २४. मातबरी २६. गेयता २८. शेळी २९. अप्रामाणिक ३१. घन ३३. चलाखी ३५. हौदा ३६. यमक ३८. थवा ४०. काबुली ४१. सासर ४३. हलवा ४५. मनःपूत ४६. द्रव ४७. धीरोदात्त ४९. पटकन ५१. सराफ ५३. कामिनी ५५. रडार ५७. पळ ५९. डबीर ६०. सरवा ६२. शहानिशा ६४. लांब ६५. बालेकिल्ला ६६. साल ६८. आब ६९. कापालिक ७१. गाथा ७२. वयोवृद्ध ७४. लड ७५. पोप ७८. खूर ७९. शोकगीत ८१. तरणी ८२. वैराण ८५. कळप ८८. धन ८९. बडवा ९१. हेका ९३. सर्वसमावेशक ९४. भला ९५. पादप ९७. टेहळणी ९९. पारी १००. मठ १०१. विपरीत १०३. विकल १०६. कुस्ती १०७. वात्रट १०८. भाऊबीज ११०. हाकाटी १११. सफल ११२. माफक ११३. लागीर ११४. यजन

**उभे शब्द :** १. कौतुक २. दीपक ३. प्राणघातक ४. तिथे ५. करडू ७. कोलकाता ८. रक्षक ९. संधी १०. धारिष्ट १३. डालगे १५. वेडा १७. नष्टप्राय १९. टब २२. कोळी २३. कर्जदार २४. माणिक २५. रीघ २७. यत्न २८. शेखी ३०. मामलेदार ३२. नथ ३३. चबुतरा ३४. लाली ३५. हौस ३७. कलप ३९. वामन ४०. कापूस ४१. सावकार ४२. अधीर ४४. वाटप ४८. रोडावलेला ५०. कळक ५२. फडशा पाडणे ५४. नीलांबर ५६. पौर ५८. पाशबद्ध ६०. सल्लागार ६१. वासा ६३. निकाल ६७. लवकर ६८. आवृत्त ७०. कपोत ७३. योगी ७६. परवशता ७७. अवैध ७८. खूण ८०. सळसळ ८३. रानभरी ८४. तोंडपाठ ८६. पर्वणी ८७. सामाजिक ९०. वाद ९२. काटेरी ९६. पवित्रक ९८. हतभागी ९९. पाऊस १००. मस्ती १०२. पट १०३. विजय १०४. लहान १०५. बटीक १०६. कुल १०७. वाफ १०९. ऊर

# अजित पवारांची दादागिरी! शिंदेंना ठेंगा! पुणेही घेतले

पान १ वरून

मिळणार हे आधीच ठरले होते. त्यानुसार हे घडले आहे. दादा कधीच नाराज नव्हते. राष्ट्रवादीचे सुनील तटकरे म्हणाले की, अजित पवार नाराज नाहीत. राष्ट्रवादीच्या मंत्री आणि आमदारांच्या मनातही अशी नाराजी नाही. आम्हाला जे मिळाले आहे ते योग्य आहे.

या यादीनुसार अजित पवार (पुणे), अकोला (राधाकृष्ण विखे-पाटील), सोलापूर आणि अमरावती (चंद्रकांत पाटील), भंडारा (विजयकुमार गावीत) बुलडाणा (दिलीप वळसे पाटील), हसन मुश्रीफ (कोल्हापूर), धर्मरावबाबा अत्राम (गोंदिया), धनंजय मुंडे (बीड), संजय बनसोडे (परभणी), अनिल पाटील (नंदूरबार), सुधीर मुनगंटीवार (वर्धा) यांच्याकडे पालकमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. गुलाबराव पाटील यांच्याकडे जळगाव आणि बुलडाणा जिल्ह्याची जबाबदारी होती. त्यातील बुलडाणा जिल्ह्याचे पालकमंत्रिपद वळसे-पाटील यांना देण्यात आले आहे. दिपक केसरकर यांच्याकडे मुंबई शहर आणि कोल्हापूर यापैकी कोल्हापूरचे पालकमंत्रिपद नव्या मंत्र्यांना देण्यात आले आहे. अतुल सावे यांच्याकडील जालना आणि बीड या जिल्ह्यांपैकी बीडचे पालकमंत्रिपद नव्या मंत्र्यांकडे सोपविण्यात आले आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्याकडील चंद्रपूर आणि गोंदियापैकी गोंदियाचे पालकमंत्रिपद काढून घेण्यात आलेले आहे. राधाकृष्णा विखे-पाटील यांच्याकडे अकोलाऐवजी सोलापूर या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद सोपवण्यात आले आहे.

देवेंद्र फडणवीसांकडे एकापेक्षा अनेक जिल्ह्यांची पालकमंत्रिपदे होती. त्यांच्याकडून हा भार काढून नवीन मंत्र्यांना देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नागपूर, गडचिरोली, वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया या जिल्ह्याची जबाबदारी होती. नवीन यादीनुसार ते नागपूर, गडचिरोली या जिल्ह्यांचे पालकमंत्री असतील. तर वर्धा, अमरावती, अकोला, भंडारा, गोंदिया यांची जबाबदारी नवीन मंत्र्यांना देण्यात आली आहे.

राज्यातील पालकमंत्री नियुक्तीचा तिढा मागील अनेक दिवसांपासून सुटत नव्हता. अजित पवार गट सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर या पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून शिंदे गट आणि अजित पवार गटात संघर्ष आणि रस्सीखेच सुरू झाली. त्यावरून झालेल्या वादातून स्वातंत्र्यदिनी अनेक जिल्ह्यांत पालकमंत्र्यांऐवजी मंत्री व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी झेंडावंदन केले होते. अजित पवार गेले काही दिवस नाराज असल्याचे म्हटले जात होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा मुंबई दौऱ्यावर असताना अजित पवार त्यांना भेटायला गेले नव्हते. काल मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही त्यांनी दांडी मारली होती. ते आजारी असल्याचे कारण देण्यात आले. अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काल रात्री उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दिल्लीला गेले. तिथे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी त्यांनी चर्चा केली. या बैठकीत पालकमंत्रिपदावर तोडगा निघाला. दिल्लीहून परतल्यानंतर आज सकाळी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील १२ जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांची सुधारीत यादी बुधवारी जाहीर केली.

# मातोश्री सहकारी सूतगिरणी घोटाळा

पान १ वरून

खोटे आकडे उभारून शासनाकडून अनुदान लाटले. तसेच शासनाकडून सर्व्हे न करता या सर्व सूत गिरण्यांनी खाजगी लेखा परीक्षकां(ऑडिटर) कडून आकडेवारीमध्ये फेरबदल करून घेतले. राज्याचा १२ हजार कोटींचा घोटाळा यातून समोर आला आहे. या संदर्भातील तक्रार दाखल झाली, तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. याच पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे एक याचिका देखील दाखल करण्यात आली. त्यानंतर आता आयकर विभागाकडून राज्यातील चार सूत गिरण्यांवर कारवाई सुरु करण्यात आली आहे. यात काँग्रेसचे आमदार कुणाल पाटील यांच्या सूतगिरणीचीदेखील चौकशी सुरू आहे. तसेच चौकशीत नागपूरच्या दोन सूत गिरण्यांचाही समावेश आहे.

# 'डीन'ला शौचालय साफ करायला लावणे भोवले

पान १ वरून

दरम्यान, आज हेमंत पाटील यांच्याविरोधात छत्रपती संभाजीनगरमधील घाटी रुग्णालयात महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षक संघटनेच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन करण्यात आले. ही घटना अतिशय अवमानकारक असून यामुळे वैद्यकीय अध्यापकांमध्ये तीव्र नाराजी आहे, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर भारत सोनवणे यांनी दिली आहे. यानंतर संघटनेच्या वतीने अधिष्ठाता डॉ. संजय राठोड यांना निवेदन देण्यात आले. यात म्हटले की, महाराष्ट्रातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मागील कित्येक वर्षांपासून अपुऱ्या प्रमाणात मनुष्यबळ आहे. तरीही या परिस्थितीत डॉक्टर्स, नर्सेस, तंत्रज्ञ, वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचारी प्रचंड कामाचा ताण सहन करून अविरत सेवा देत आहेत. प्रशासनाने या बाबीची तत्परतेने दखल घेऊन वर्ग-१ ते वर्ग-४ तसेच आवश्यक त्या सर्व यंत्रसामुग्री व सोयीसुविधा तत्काळ उपलब्ध करून द्याव्यात, जेणेकरुन अशा घटना घडणार नाहीत.

# छापेमारीनंतर आप खासदार संजय सिंह यांना अटक

पान १ वरून

आहे. आम आदमी पक्षाने ईडीच्या छापेमारीचा निषेध केला आहे. दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्याच्या सुरू असलेल्या तपासात आप नेत्यांना अडकवण्याचा हा प्रयत्न आहे. तसेच सिंह यांनी मोदींना प्रश्न विचारल्यामुळे ही ईडीची कारवाई सुरू आहे, असा आरोप आपच्या प्रवक्त्या रीना गुप्ता यांनी केला आहे. रीना गुप्ता म्हणाल्या की, सिंह हे सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी व अदानी संबंधांवर प्रश्न उपस्थित करत होते. त्यामुळेच त्यांच्यावर ईडीने कारवाई सुरू केली आहे. याआधीही संजय सिंह यांच्या निवासस्थानी छापे टाकण्यात आले होते. पण त्या तपासात कोणतेही पुरावे आढळले नाहीत. तसेच यावेळीही होईल.

# सरकारी रुग्णालयांत मृत्युतांडव

पान १ वरून

घेतले जाणार नाही, अशी कानउघाडणी मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांनी केली. या याचिकेवर आता राज्य सरकारने गुरुवारी तातडीने आपली भूमिका मांडावी असे निर्देश खंडपीठाने दिले आहेत.

दरम्यान, नांदेडच्या रुग्णालयात २२ वर्षीय अंजली वाघमारे या महिलेला प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. शनिवारी सायंकाळी या महिलेची नैसर्गिक प्रसूती होऊन तिने मुलीला जन्म दिला. शनिवारीच नवजात मुलीचा मृत्यू झाला. त्यानंतर महिलेची प्रकृती बिघडली. आज महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# बदला घेण्यासाठी ईडी आहे का? कोर्टाचा सवाल

पान १ वरून

अन्य एका प्रकरणात या दोघांना अटक करण्यात आली. या दोघांनी पीएमएलएच्या कलम १९ अंतर्गत ही अटक बेकायदा असल्याचा दावा करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

आरोपींची पहिल्या तक्रारीची चौकशी सुरू असतानाच ईडीने दुसऱ्या तक्राबद्दल समन्स बजावले. या घटनांची क्रमवारी पाहिली तरी ईडीची हेतुपुरस्सर काम करण्याची पद्धत दिसते, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. 'ईडीने पारदर्शक, निष्पक्षता आणि सत्यतेच्या मूलभूत मापदंडांचे पालन केले पाहिजे. ईडीची कारवाई सूड घेण्याच्या भूमिकेतील नसावी. तसेच अटकेचे कारण सिद्ध करण्यासाठी केवळ रिमांडचा आदेश देणे पुरेसे नाही. ईडी ही देशातील आर्थिक गुन्ह्यांना आळा घालणारी एक प्रमुख तपास यंत्रणा असल्याने, ईडीची प्रत्येक कृती पारदर्शक, कायदेशीर आणि न्याय्य मानकांशी सुसंगत असणे अपेक्षित आहे,' अशा शब्दांत न्यायालयाने ईडीला फटकारले.

खंडपीठाने म्हटले की, २००२ च्या कठोर कायद्यांतर्गत व्यापक अधिकार असलेल्या ईडीच्या वर्तनात सूडबुद्धीची अपेक्षा नाही. या संस्थेने अत्यंत जबाबदारीने आणि अत्युच्च निष्पक्षतेने काम केले पाहिजे. या प्रकरणात ईडीला या निकषांनुसार आपली जबाबदारी पार पाडताना अपयश आल्याचे दिसत आहे.

बंसल बंधुंच्या अटकेचे कारणही ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तोंडी वाचून दाखवले होते. अटकेवेळी आरोपींना अटकेच्या कारणांची एक लेखी प्रत देणे आवश्यक आहे, असे सांगत न्यायालयाने ईडीला फटकारले. तसेच, संचालकांची अटक बेकायदा ठरवून न्यायालयानं त्यांची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले.


महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ : कार्यकारी अभियंता, मुंबई प्रदेश किरोल रोड : विद्याविहार [ पश्चिम ] : मुंबई-400 086

Email. eemumbai@rediffmail.com Phone 022-25136303

क्र.राप / काअमुं / ईनिविदा / 590 दिनांक: 03/10/2023

ई–निविदा सुचना क्रमांक 04 सन 2023–24

कार्यकारी अभियंता, रा.प. मुंबई प्रदेश, किरोल रोड, विद्याविहार [प] मुंबई–86 दूरध्वनी क्र. 25136303 हे सार्वजनिक बांधकाम खाते महाराष्ट्र राज्य यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत तसेच राज्य व केंद्र शासनाच्या संस्था यांचेकडे नोंदणीकृत व योग्य त्या वर्गात वर्गीकरण केलेल्या तसेच काम क्र. 1 करीता अनोंदणीकृत परंतु अनुभवी व तांत्रिक/आर्थिक दृष्टया सक्षम असलेल्या ठेकेदारांकडुन ई–निविदेकरीता निविदा मागवित आहेत.

| ई-ID क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रु |
|---|---|---|
| 949455_1 | रा.प. रत्नागिरी विभागातील लांजा बसस्थानकाचे नुतनीकरण करणे. (उर्वरीत काम) | 15254170.00 |
| 949455_2 | रा.प. मुंबई विभागातील परळ आगारात विद्युत सबस्टेशन बांधणे. (दुसरी मागणी) | 6187096.00 |

ई-निविदेचे वेळापत्रक

| क्र. | महामंडळाचा टप्पा | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1. | निविदा डाउनलोड व विक्री व तयार करणे | 05.10.2023 | 10.00 |
| 2. | ऑनलाईन निविदा विक्री बंद करणे | 16.10.2023 | 16.00 |
| 3. | तांत्रिक व वाणिज्य लिफाफा उघडणे, शक्य झाल्यास | 18.10.2023 | 10.00 |
| 4. | देकार पुर्व बैठक (काम क्र. 1 साठी) | 10.10.2023 | 11.00 |

टीपः– 1. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदा पत्रात डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई–निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in वर मदत घेणे आवश्यक आहे. तसेच महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
2. काम क्र. 2 साठी सदरील प्रकारचे काम केलेल्याचा अनुभव असणे आवश्यक असुन सदरील कामासाठी महानगरपालिका/ बेस्ट कार्यालयाकडुन लागणारी परवानगी ठेकेदारांनी स्वखर्चाने घेणे आवश्यक राहील.
3. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

कार्यकारी अभियंता
रा.प.मुंबई प्रदेश (कुर्ला)



THE NEW SARVAJANIK EDUCATION SOCIETY'S
K. V. K. GHATKOPAR SARVAJANIK SCHOOL
Ghatkopar (West), Mumbai 400086.
APPLICATIONS ARE INVITED FOR THE POST OF HEAD TEACHER (PRIMARY ENGLISH MEDIUM SECTION) FOR GOVT. AIDED MINORITY SCHOOL
Required qualifications are HSC with D.Ed and total 05 Years of full time teacher's experience in recognized Primary School along with Diploma in School Management as per Government GR. Candidates must have ability to correspond & communicate in English & Marathi. Applicants who are already employed in schools run by our Society should send their application through proper channel. Apply to "Executive Secretary" on or before 12th Oct. 2023
Add: The New Sarvajanik Education Society, Chhadha Building, Ground Floor, Plot No. 95, Scheme 57, Near Lijjat Papad, off. Gate No. 4, R. A. Kidwai Road, Wadala, Mumbai - 400 031.



TENDER NOTICE
Reputed Civil contractors invited for Building Structural Repairing, Water Proofing, Painting, & allied works
"GOKUL C.H.S LTD."
Plot No.14, Sector-19A, Nerul, Navi Mumbai 400 706
Application & tender fees Rs. 5000/- Cash (Non-Refundable) shall be submitted at Consultant office between 11:00 am to 5:00 pm on dated 05/10/2023 to 11/10/2023
Blank tender documents will be issued to the applicants only at Consultant office between 11:00am to 5:00 pm on dated 12/10/2023
Sealed tenders shall be submitted at Society office between 10:00 am to 05:00 pm on or before dated 23/10/2023
PROJECT MANAGEMENT CONSULTANTS
M/s Suyog Structural Design Consultant's
Office Address: 103, 1st Floor, Technocity Building, Plot No. X-5/3, Near Hotel Sarovar Portico, TTC Industrial Area, MIDC Mahape, Navi Mumbai. Phone No. – 022 277 80 666



महावितरण सूत्रधारी कंपनी मर्यादित (महाराष्ट्र शासन उपक्रम)
ई-निविदा सुचना
मुख्य अभियंता (स्था.), एमएसईबीएचसीएल मुंबई, ई-निविदा क्र. CEC/MSEBHCL/MUM/TECH/T-36-2023-24 ला आमंत्रित करत आहेत बिड कागदपत्रे ०५.१०.२०२३ पासुन वेबसाइटवर उपलब्ध होतील. अधिक तपशीलसाठी आणि अद्यतनांसाठी आमच्या वेबसाइट www.mahadiscom.in, ई-निविदा दुव्यास https://etender.mahadiscom.in ला भेट द्या. Ph-022-22608383
HO PR No. 367 Dt. 03.10.2023 मुख्य अभियंता (स्थापत्य)



INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण
बंदर नियोजन आणि विकास विभाग
संक्षिप्त ई-निविदा सूचना
निविदा क्र.: पीपीडी/डीजीएम-दोन /सिटी क्रॅश बॅरीअर /टी- 22 (R)/2023 दिनांक 25.09.2023
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण "जेएन पोर्ट कस्टम बाउंड परिसरातील सामान्य रेल्वे यार्डमधील रेल्वे लाइन क्रमांक टी-3 आणि निर्गम मार्गादरम्यान मेटल क्रॅश बॅरियर निश्चित करणे" या कामासाठी या निविदेमध्ये करार निविष्ट केलेल्या "किमान अर्हताकारी निकषांची" पूर्तता करणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांकडून दोन लिफाफ्यांमध्ये "ऑनलाइन" टक्केवारी दर तत्वावर निविदा मागवीत आहेत. कामाचा अंदाजित रु. 1,93,45,061/- इतका आहे. पूर्ण भरलेल्या इ- निविदा दिनांक 19.10.2023 रोजी 1500 वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी "ऑन लाईन" मागविण्याची तपशीलवार सूचना तसेच निविदा दस्तऐवज जेएनपीएच्या www.jnport.gov.in आणि https://gem.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. GeM Bid no.: - GEM/2023/B/4036926
मुख्य महाव्यवस्थापक
(बंदर नियोजन आणि विकास विभाग)



नवी मुंबई महानगरपालिका
शहर अभियंता विभाग
निविदा सुचना क्र.नमुंमपा /शहर अभियंता विभाग/ 258/2023-24
कामाचे नाव :- (87835) कोपरखैरणे विभागातील बोनकोडे गावातील हलदर देऊ नाईक उदयान, सेक्टर 12सी ते मरिना पॅलेस सोसायटी भूखंड क्र.बी-94 पर्यंतच्या मुख्य रस्त्याची TWT पध्दतीने सुधारणा करणे.
अंदाजपत्रकीय रक्कम रु. :- 2,43,88,242/-
निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणकप्रणालीच्या https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळावर दिनांक 05/10/2023 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://nmmc.etenders.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.
कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.
सही/-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका
जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/751/2023



अनुसूची II
फॉर्म बी
जाहीर उद्घोषणा
(नादारी आणि दिवाळखोरी (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)
सोनार्च इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता

| अ.क्र. | तपशील | तपशील |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट धनकोचे नाव | सोनार्च इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट धनकोच्या स्थापनेचा दिनांक | १९.०२.२००८ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट धनकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | कंपनी निबंधक, मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट धनकोचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U51900MH2008PTC179108 |
| ५. | कॉर्पोरेट धनकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | बी-११२, हिंद सौराष्ट्र इंडस्ट्रियल इस्टेट, मरोळ नाका, अंधेरी (पूर्व), मुंबई महा. ४०००५९ भारत. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | ०४.०९.२०२३ |
| ७. | कॉर्पोरेट धनकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | ०४.०९.२०२३ (परिसमापकांना दि. ०३.१०.२०२३ रोजी आदेश सूचित करण्यात आला.) |
| ८ | परिसमापकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | श्री. विमल कुमार अग्रवाल IBBI/IPA-001/IP-P00741/2017-2018/11247 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | कार्यालय क्र. ४, तळमजला, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनजवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ईमेलः cirp.sonarch@gmail.com / vimal@vpagrawal.in |
| १० | दावा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १७.१०.२०२३ |

याद्वारे सूचना देण्यात येते की, मान. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी सोनार्च इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिनांक ४ सप्टेंबर, २०२३ रोजी दिले आहेत.
सोनार्च इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी किंवा त्यापूर्वी परिसमापकाकडे बाब क्र. ९ समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुरावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**
अंतरिम ठराव व्यावसायिकाचे नाव आणि स्वाक्षरीः विमल कुमार अग्रवाल
दिनांक आणि ठिकाण : ०५.१०.२०२३, मुंबई